RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक १] गुरुवार, जानेवारी ८, २०२६/पौष १८, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उपविभागीय अधिकारी, राजापूर यांजकडून

**जाहीर नोटीस**

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस.**

क्रमांक भूसंपादन/थेट खरेदी/एलएक्यू/एसआर/१७४/२०२५.—ज्याअर्थी, मौजे काजिर्डा-ब्राम्हणखोरे, ता. राजापूर येथील खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प राजापूर, जि. रत्नागिरी काजिर्डा- ब्राम्हणखोरे पुनर्वसन गावठाण भूसंपादन प्रयोजनाकरिता शासन निर्णय संकिर्ण महसूल व वनविभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दि. १२ मे २०१५ व शासन परिपत्रक क्रमांक एलएक्यू-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दि.२५ जानेवारी २०१७ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग चिपळूण यांचे थेट पध्दतीने संपादन करण्याचे प्रयोजन आहे.

**१.** उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदींच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे :—

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चिपळूण यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि,

२. प्रकल्पासाठी जमिनी थेट खरेदी करताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व परिशिष्ट १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.

३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिनी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चिपळूण यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असलेबाबतची संमत्ती पत्रे (विकल्प) सादर केलेली आहेत.

**२.** संमत्तीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अभियंता, गडगडी प्रकल्प उपविभाग, देवरुख (संगमेश्वर) व उपविभागीय अधिकारी राजापूर, यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

**३.** सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी राजापूर, कार्यकारी अभियंता पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चिपळूण व उपविभागीय अभियंता गडगडी प्रकल्प उपविभाग, देवरुख (संगमेश्वर), यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी पुढे ठेवण्यात आलेली आहे.

## अनुसुची १

## खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील

गाव काजिर्डा-ब्राम्हणखोरे, तालुका राजापुर, जिल्हा रत्नागिरी

| अनु क्र. (१) | सर्व्हे नंबर (२) | गा.न.नं.७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर.) (३) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर.) (४) |
|---|---|---|---|
| १ | १३२ | ०.०१.०० | ०.०१.०० |
| २ | १३३/४ | २.२६.०० | २.०३.५४ |
| ३ | १३५/१ | १.२७.०० | १.२७.०० |
| ४ | १३५/२/अ | ०.५०.०० | ०.५०.०० |
| ५ | १३५/२/ब | ०.५०.०० | ०.५०.०० |
| ६ | १३५/२/क | ०.५०.०० | ०.५०.०० |
| ७ | १३५/२/ड | ०.५०.०० | ०.५०.०० |
| ८ | १३५/३/अ | ०.४३.०० | ०.४३.०० |
| ९ | १३५/३/ब | ०.४२.०० | ०.४२.०० |
| १० | १३५/३/क | ०.४३.०० | ०.४३.०० |
| ११ | १३५/३/ड | ०.४३.०० | ०.४३.०० |
| १२ | १३५/५ | ०.५५.०० | ०.५५.०० |
| १३ | १३५/७/अ | १.०३.०० | १.०३.०० |
| १४ | १३५/७/ब | ०.६०.०० | ०.६०.०० |
| १५ | १३५/७/क | ०.६०.०० | ०.६०.०० |
| १६ | १३५/७/ड | ०.८०.०० | ०.८०.०० |
| १७ | १३५/७/इ | ०.७०.०० | ०.७०.०० |
| १८ | १३५/८ | १.३१.०० | ०.१२.८० |
| १९ | १३६/१ | ३.५४.०० | १.३४.४२ |
| २० | १३६/२ | ०.१३.०० | ०.१३.०० |
| २१ | १३६/३ | १.६८.०० | ०.८८.३३ |
| २२ | १३६/५ | १.२७.०० | १.१२.२५ |
| २३ | १३६/६/अ | ०.३८.०० | ०.३८.०० |
| २४ | १३६/६/ब | ०.३९.०० | ०.३९.०० |
| २५ | १३६/६/क | ०.३८.०० | ०.३८.०० |
| २६ | १३६/६/ड | ०.३८.०० | ०.३८.०० |

| अनु क्र. (१) | सर्व्हे नंबर (२) | गा.न.नं.७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर.) (३) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर.) (४) |
|---|---|---|---|
| २७ | १३६/७ | २.०९.०० | २.०९.०० |
| २८ | १३६/८ | ०.४७.०० | ०.४७.०० |
| २९ | १३७/३ | ६.४९.०० | ६.०४.५० |
| ३० | १३७/४ | ०.५९.०० | ०.५५.०४ |
| ३१ | १३७/५ | ०.५२.०० | ०.५२.०० |
| ३२ | १४०/८ | २.७६.०० | २.७२.३५ |
| ३३ | १४०/१० | २.०९.०० | १.९८.२९ |
| ३४ | १४२/३ | ०.१३.७० | ०.१२.९१ |
| ३५ | १४२/५ | ०.०९.१० | ०.०९.१० |
| ३६ | १४२/६ | ०.०७.१० | ०.०७.१० |
| ३७ | १४२/७ | ०.०७.६० | ०.०६.९३ |
| ३८ | १४२/८ | ०.०९.६० | ०.०९.१९ |
| ३९ | १४२/९ | ०.१२.६० | ०.१२.६० |
| ४० | १४३/१ | ४.६८.०० | ०.९८.४२ |
| ४१ | १४३/३ | ०.२९.०० | ०.०४.३१ |
| ४२ | १४३/५ | ०.३९.०० | ०.१४.८७ |
| ४३ | १४३/७ | १.२४.७० | ०.३२.७१ |
| ४४ | १४३/८ | ०.१३.१० | ०.१३.१० |
| ४५ | १४३/९ | ०.०९.१० | ०.०९.१० |
| ४६ | १४३/१० | ०.११.१० | ०.११.१० |
| **एकूण संपादन करावयाचे क्षेत्र** | | | **३३.२३.९६** |

**प्रयोजन—**जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता. राजापूर, जि. रत्नागिरी काजिर्डा- ब्राम्हणखोरे पुनर्वसन गावठाण भूसंपादन प्रयोजनाकरिता थेट खरेदीचा प्रस्ताव.

**खरेदीचे क्षेत्र :—३३.२३.९६** ( हे.आर. )

शासन निर्णय संकिर्ण महसूल व वनविभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२ मे २०१५ व शासन परिपत्रक क्रमांक एलएक्यु ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग चिपळूण यांचे अंतर्गत बुडीतक्षेत्र मौजे काजीर्डाचे भूसंपादन प्रयोजनाकरीता थेट पध्दतीने संपादन करण्याचे प्रयोजन आहे.

त्यास अनुसरुन याद्वारे अशी जाहीर नोटीस देण्यात येते की, सदर संपादन प्रक्रियेसाठी जमिनीचा मोबदला मा. जिल्हाधिकारी यांचे

अध्यक्षतेखाली समिती ठरविणार आहे व सदर दरानुसार उक्त संपादन करण्याच्या जमिनीचे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग चिपळूण यांचेकडून सदर दरानुसार थेट खरेदी करण्यात येईल.

तरी, उक्त जमिनीमध्ये हितसंबंधात असणाऱ्या सर्व व्यक्तींना असे कळविण्यात येते की, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर, मा. जिल्हाधिकारी कार्यालयाची मंजूरी न मिळविता विक्री, भाडेपट्टी, गहाण, अभिहस्तांतरण, देवाण-घेवाण याद्वारे किंवा अन्य प्रकारे उक्त जमिनीची विल्हेवाट लावण्या संदर्भात करण्यात आलेले कोणतेही करार किंवा त्या संबंधात आलेला कोणताही खर्च किंवा सुधारणा याकडे मोबदला निश्चित करणारी समिती दुर्लक्ष करील.

उक्त जमिनीचे गट क्रमांक/सर्व्हे क्रमांक, नकाशे आणि खाजगी वाटाघाटीने खरेदी करावयाचे क्षेत्र इत्यादी बाबी खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरीता उपलब्ध आहेत.

१. उपविभागीय अधिकारी, कार्यालय राजापूर.

२. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,कार्यालय चिपळूण.

३. उपविभागीय अभियंता गडगडी प्रकल्प उपविभाग, देवरुख (संगमेश्वर)

संपादन संस्थेच्या पॅनलवरील वकील यांची मान्यता आहे.

ठिकाण राजापूर,
दिनांक ६ जानेवारी, २०२६.

**डॉ. जॅसमिन,**
सहाय्यक जिल्हाधिकारी (भा.प्र.से.),
तथा उपविभागीय अधिकारी राजापूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.